आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

1. हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिनाचा उत्साह.
2. आशिया खंडातील सर्वांत मोठ्या वाढवण बंदराचं उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन; प्रकल्पाद्वारे १२ लाख रोजगार निर्माण होणार.
3. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची कारणे शोधण्यासाठी नौदल-राज्य शासनाची संयुक्त तांत्रिक समिती नेमण्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय.
4. उद्या चंद्रपूर आणि गडचिरोली इथं मुसळधार पावसाचा अंदाज तर शनिवारी गडचिरोली इथं अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.

****

राष्ट्रीय क्रीडा दिन

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा होत आहे. केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री डॉ.मनसुख मांडवीय यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदानावर असलेल्या ध्यानचंद यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. सर्व नागरीकांनी त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून एक तास काढून, आपल्या आवडीचा खेळ खेळावा, असं आवाहन मांडवीय यांनी केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रिडा दिनानिमित्त समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात, मेजर ध्यानचंद यांना अभिवादन केलं आहे. खेळाबद्दल आत्मियता असलेल्या आणि खेळात देशाचं नाव उंचावलेल्या सर्वांचं कौतुक करण्याचा हा दिवस असल्याचं ते म्हणाले. दरम्यान, क्रीडा मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आज राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाद्वारा नागपुरात राष्ट्रीय क्रीडा दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे.या अंतर्गत, धावण्याची स्पर्धा,टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ इत्यादी स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

वाढवण बंदर

वाढवण बंदर महाराष्ट्रासोबत देशाची वेगळी ओळख निर्माण करायला मदत करेल असा विश्वास केंद्रीय बंदर, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज व्यक्त केला. वाढवण बंदराचं उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ते आज पालघरमध्ये आयोजित वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. आशिया खंडातील हे सर्वात मोठं बंदर असेल आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरामध्ये याचा समावेश असेल. आत्मनिर्भर भारतात हे बंदर एक महत्वाची भूमिका बजावेल, शिवाय या बंदरामुळे १२ लाख लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या रोजगार मिळेल असं सोनोवाल म्हणाले. स्थानिकांशी चर्चा करून राज्य सरकारच्या नियमानुसार त्यांना मोबदला दिला जाईल तसेच इथल्या रोजगारासाठी आवश्यक कौशल्य स्थानिक युवकांना शिकवली जातील, अशी माहिती केंद्रीय बंदर, जलमार्ग आणि नौकानयन सचिव टी.के.रामचंद्रन यांनी यावेळी दिली.

****

नितीन गडकरी

जुन्या प्रदूषणकारी व्यवसायिक तसंच प्रवासी गाड्या भंगारात काढून त्याजागी नव्या कमी प्रदुषणकारी गाड्या घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनं काल दिल्लीत महत्त्वाची बैठक पार पडली. भारत मंडपम् इथं काल झालेल्या बैठकीत रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी भारतीय स्वयंचलित वाहन निर्माता सोसायटीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधला. देशभरातून भंगार गाड्या टप्प्याटप्प्यानं बाद करण्यासाठी नवी प्रणाली राबवण्याच्या हेतूनं स्वयंसेवी पद्धतीने वाहनाचे आधुनिकीकरण कार्यक्रम किंवा वाहन भंगारात काढण्याचे नवे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

****

गृहनिर्माण मंत्री अतुल सावे

राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना दर्जेदार आणि माफक दरात हक्कांची घरे मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याच गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. राज्य शासनाने महिलांना गृहखरेदीमध्ये १ टक्के मुद्रांक शुल्क सवलत जाहीर केलेली आहे. याचा रिअल इस्टेट उद्योगाला अप्रत्यक्षपणे मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे रियल इस्टेट क्षेत्रातील कंपन्यांनी सकारात्मक सहभाग नोंदवावा असं आवाहनही मंत्री सावे यांनी केलं. नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या वतीने मुंबईत आयोजित ‘द रिअल इस्टेट फोरम २०२४’ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

****

छत्रपती शिवाजी पुतळा

मालवण तालुक्यातील राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यामागची कारणमीमांसा करण्यासाठी स्थापत्य अभियंते , तज्ज्ञ, आयआयटी तसेच नौदलाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक तांत्रिक संयुक्त समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य आणि अत्युत्कृष्ट पुतळा उभारण्याच्या दृष्टीने देशातील उत्तम शिल्पकार, स्थापत्य अभियंते, तज्ज्ञ, आणि नौदलाचे अधिकारी यांचीही एक समितीही नेमण्याचे निर्देश त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहे. या घटनेसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा इथं संबंधितांची बैठक बोलाविली होती. बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि पालकमंत्री रवींद्र चव्हाण, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते. 'झालेली घटना दुर्दैवी असून शिवभक्तांच्या भावना तीव्र आहेत. नौदलाने हा पुतळा राजकोट येथे नौदल दिन साजरा करण्याच्या निमित्ताने एका चांगल्या भावनेने उभारला होता. भविष्यात आपल्याला अशी दुर्घटना परत कधीच घडू नये यासाठी अतिशय काळजी घेतली पाहिजे,' असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पडल्या प्रकरणी कुणालाही माफी नाही, कारवाई होणारच, असं उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी म्हटलं आहे. ते आज बीड इथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेत बोलत होते. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होईल, असं त्यांनी सांगितलं.

****

लाडकी बहीण

महिलांचं आरोग्य सुदृढ रहावं, त्यांना पूरक पोषण मिळावे हा ‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने’च्या व्यापक उद्देशापैकी एक महत्वाचा उद्देश सफल होत असल्याचं चित्र राज्यात सर्वत्र दिसून येत आहे. नागपूर येथील कामठीच्या पंचफुला पाटील या काबाड कष्ट करून प्रपंच पुढे घेवून जाताना मतिमंद मुलीची जबाबदारीही पार पडत आहेत. त्यांना या योजनेचा फायदा झाल्याचं त्यांनी सांगितलं आहे.

*(होल्ड बाईट-**34** सेकंद)*

*मी जो हा फॉर्म भरला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा त्याचे मला तीन हजार रुपये मिळाले. त्याचा मला खूप लाभ आहे. मी भांडे विकायला जाते. त्यामुळे माझी तब्येत बरी राहत नाही. तर हे पैसे माझ्या खात्यामध्ये जमा होतील. त्यामुळे मला समोर कामामध्ये मदत होईल. कारण मला एक मुलगी आहे. ती मंतीमंद आहे.*

*तिला सुद्धा दीड हजार रुपये महिना मिळतो. हे जमा झालेले पैसे माझ्या मुलीच्या सुद्धा उपयोगी येऊ शकते.*

****

'नारी न्याय आंदोलनं'

महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमेटीच्या वतीने आज नागपुरात संविधान चौकात 'नारी न्याय आंदोलनं' करण्यात आलं. या आंदोलनात महिलांना लोकसभा, आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षण मिळावं, राज्यात महिलांवरील अत्याचार थांबावेत यांसह विविध मुद्यांवर आवाज उठविण्यात आला. महिलांना न्याय देण्याकरिता देशातील अनेक राज्यांत "नारी न्याय आंदोलनं करण्यात येणार असल्याचं यावेळी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष अलका लांबा यांनी सांगितलं. आंदोलनात सरचिटणीस मुकुल वासनिक, प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांसह काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

****

पंकजा मुंडे

गेल्या दहा वर्षामध्ये राज्यात महिलांवरील अत्याचारामध्ये वाढ झाली आहे, अशी खंत भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी आज पंढरपुरात व्यक्त केली. अशा घटनांवर कोणी राजकारण करू नये, असं आवाहनही त्यांनी केलं आहे. बदलापूर घटनेवर भाष्य करताना, राज्यात गेल्या दहा वर्षात महिलांवरील अत्याचारांच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. निर्भया ते बदलापूरपर्यंत महिलांवरील अत्याचारामध्ये क्रूरता वाढ चालली आहे. या क्रूरतेवर अधिक लक्ष दिलं गेलं पाहिजे, असं त्या म्हणाल्या.

****

विद्यार्थी सुरक्षा कार्यशाळा

राज्यातील वाढत्या महिला अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अमरावती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात महिला विद्यार्थी सुरक्षा उपाययोजना व सायबर गुन्हे जागरूकता कार्यशाळा घेण्यात आली. महिला विद्यार्थी यांच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या कायद्या संदर्भातील जनजागृती, सायबर सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली खबरदारी यासह विविध प्रकारची जनजागृती कार्यशाळे दरम्यान पोलिसांनी केली.

****

सीडीएस परीक्षा

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे येत्या १ सप्टेंबरला सीडीएस म्हणजेच संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा आयोजित करण्यात आली असून ही परीक्षा सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते २ आणि ३ ते ५ या वेळेत घेण्यात येईल. तर एनडीए परीक्षा सकाळी १० ते साडेबारा आणि दुपारी २ ते साडेचार या वेळेत घेण्यात येईल.

****

मनोज जरांगे

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी येत्या 29 सप्टेंबरपासून पुन्हा आमरण उपोषण करण्याचा निर्धार आज आंतरवाली सराटी इथं जाहीर केला. ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण मिळावं, या मागणीसाठी म्हणून जरांगे यांनी गतवर्षी २९ ऑगस्ट रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमधून आंदोलन सुरू केलं होतं.या आंदोलनाची वर्षपूर्ती झाल्याच्या निमित्ताने ,जरांगे यांनी गोदापट्ट्यातील १२३ गावांच्या आंदोलक समन्वयकांची, आज आंतरवाली इथं बैठक बोलावली होती. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत हे उपोषण सुरूच राहणार असं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

हवामान

अकोला, बुलढाणा आणि वाशिम हे जिल्हे वगळता, संपूर्ण विदर्भात आज मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या संपूर्ण विदर्भात पावसाची शक्यता असून चंद्रपूर आणि गडचिरोली इथं मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.तर परवा शनिवार रोजी गडचिरोली इथं अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, यवतमाळ आणि चंद्रपूर इथं देखील मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

*****